लोकमत

# अरविंद विद्यालयात सायबर सुरक्षाबाबत कार्यशाळा

लोकमत न्यूज नेटवर्क

**अडगाव खुर्द :** अकोट तालुक्यातील अडगाव खुर्द येथील अरविंद विद्यालयात सायबर सुरक्षाबाबत कार्यशाळेचे आयोजन केले होते.

याप्रसंगी अकोला येथील शंकरलाल खंडेलवाल महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. जगदीश साबू, भौतिकशास्त्र विभागाचे डॉ. हरिदास खरात यांच्या मार्गदर्शनाखाली सुमित सपकाळ, अनिकेत भुडके या विद्यार्थ्यांनी सायबर



सुरक्षा बाबत, ऑनलाइन फसवणूक, वाढता सोशल मीडियाचा वापर त्यामधून होणारी फसवणूक, आपण करीत असलेली ऑनलाइन खरेदी या विषयावर मार्गदर्शन केले. हा कार्यक्रम क्विक हिल फाउंडेशन पुणे, महाराष्ट्र सायबर सेल मुंबई यांच्या सहयोगाने पार पडला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षा मुख्याध्यापिका मालती देशमुख होत्या. यावेळी त्यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. या प्रसंगी शाळेतील सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.